बुधवार दि.१६ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ४२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

## विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर

# महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी मतदान २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर झाला. राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान पार पडणार असून, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आज पत्रकार परिषद घेवून महाराष्ट्र आणि झारखंड राज्यांच्या विधानसभा निवडणुका तसेच देशातील विधानसभा, लोकसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ. सुखबीर सिंग संधू यासोबत वरिष्ठ अधिकारी महेश गर्ग, अजित कुमार, संजय कुमार, अनुज चांडक उपस्थित होते. निवडणूक कार्यक्रमांच्या या घोषणेने राज्यात आजपासून आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. महाराष्ट्रातील विधानसभेच्या एकूण २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. २२ ऑक्टोंबर निवडणूक अधिसूचना जारी होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख २९ ऑक्टोंबर असून, ३० ऑक्टोबरला अर्जांची छानणी होणार आहे. अर्ज माघारी घेण्याची मुदत ४ नोव्हेंबर पर्यंत असेल. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. २५ नोव्हेंबर रोजी राज्यातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल.




महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे असून २८८ जागांवर मतदान होणार आहे. यातील २३४ जागा या सर्वसाधारण उमेदवारांसाठी असून, अनुसूचित जमात प्रवर्गासाठी २५ तर २९ जागा या अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत. राज्यात एकूण ९.६३ कोटी मतदार असून, यामध्ये ४.९७ कोटी पुरुष आणि ४.६६ कोटी महिला मतदारांचा समावेश आहे. राज्यभरात एकूण १ लाख १८६ मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यापैकी ४२ हजार ६०४ मतदान केंद्रे शहरी भागात तर ५७ हजार ५८२ मतदान केंद्रे ग्रामीण भागात आहेत.यावेळी निवडणूक आयोगाने ५३० मॉडेल मतदान केंद्र उभारण्याचे नियोजन केल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी यावेळी दिली. या निवडणुकीत १८.६७ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. तसेच ६ लाख २ हजार दिव्यांग मतदार व १२ लाख ५ हजार ज्येष्ठ नागरिक मतदार यावेळी आपला मतदानाचा हक्क बजावतील. राज्यातील निवडणुकीसाठी सखोल तयारी सुरू असून नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, नांदेडमध्ये होणाऱ्या लोकसभा पोटनिवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी होईल. नांदेड लोकसभा मतदारसंघातील विद्यमान खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ही पोटनिवडणूक घेण्यात येणार असल्याची माहिती यावेळी मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिली. यासोबतच, केरळमधील एका विधानसभेच्या मतदारसंघात आणि वायनाड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक १३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तसेच, उत्तराखंडमधील एका विधानसभेच्या मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक घेण्यात येईल.भारत निवडणूक आयोगाकडून जिल्हा निवडणूक अधिकारी (अएजी) आणि पोलीस अधीक्षक (डझी) यांना विशिष्ट निर्देश दिले आहेत, ज्यायोगे निवडणूक प्रक्रियेमध्ये सर्व पक्षांसाठी समान पातळी निर्माण केली जावी. यात पूर्ण निष्पक्षता राखून कार्य करण्याबाबत आणि सर्वांसाठी समान पातळी सुनिश्चित करणे, मतदानाच्या दिवशी राजकीय पक्षांच्या डेस्कच्या उभारणीसाठी क्षेत्राचे स्पष्ट चिन्हांकन करणे, सर्व मतदान केंद्रांमध्ये १००% वेबकास्टिंग सुनिश्चित करणे, सर्व मतदान केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा सुनिश्चित करणे - विशेषतः शहरी भागात लांब रांगा असतील तिथे वयस्करांसाठी बसण्याची सोय, मतदारांची सोय पाहता मतदान केंद्रे निवासस्थानापासून २ किलोमीटरच्या आत असल्याची खातरजमा, 'पब्लिक डिफेसमेंट अ‍ॅक्ट' अंतर्गत लोकांचा अनावश्यक छळ टाळणे, केंद्रीय निरीक्षकांची माहिती सार्वजनिक करणे व सोशल मीडियावर लक्ष ठेवून, खोट्या बातम्यांवर त्वरीत प्रतिसाद देण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.भारत निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेला अधिक पारदर्शक, वेगवान आणि तंत्रज्ञान आधारित बनवण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. या बदलांमुळे मतदार आणि उमेदवारांना अधिक सोयी आणि सुलभता मिळणार आहे. मतदार नोंदणी प्रक्रिया डिजिटल झाली असून, मतदारांना घरबसल्या ऑनलाइन फॉर्म भरून नोंदणी करता येते. मतदान केंद्राची माहितीही ऑनलाइन पाहता येते. ई-ईपीआयसी हे नवीन डिजिटल मतदार ओळखपत्र डाउनलोड करून सुरक्षित ठेवण्याची सुविधा मिळाली असून, सी-विजिल ॲपच्या माध्यमातून मतदारांना कोणत्याही गैरकृत्यांची माहिती थेट आयोगाला देता येते, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता येते.उमेदवारांसाठीही आयोगाने सुविधा पोर्टल उपलब्ध केले आहे, ज्याद्वारे उमेदवार नामांकन आणि शपथपत्र ऑनलाइन दाखल करू शकतील. याशिवाय, उमेदवारांच्या घधउ ची संपूर्ण माहिती, जसे की गुन्हेगारी नोंदी, आयोगाच्या पोर्टलवर उपलब्ध आहे. प्रचारासाठी सभा, रॅलींसाठी ऑनलाइन परवानगी घेण्याची सुविधाही उपलब्ध झाली आहे. या नवीन तंत्रस्नेही पद्धतीमुळे निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक बनली आहे. याबाबत, ऑनलाइन सुविधा उपलब्ध असल्यामुळे मतदार आणि उमेदवारांना कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागणार नाही.

# प्रधानमंत्री आवास योजनेचा प्रलंबित हप्तासाठी भिकमागो आंदोलन

## दिवाळीपूर्वी हप्ता द्या अन्यथा विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घालणार?

## नगर परिषद मुख्याधिकारी यांना ८० नागरीकांच्या सहयाचे निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

सिंदखेडराजा येथील प्रधानमंत्री आवास योजनेचा प्रलंबित चौथा हप्ता तात्काळ न मिळाल्यास विधानसभा निवडणूक मतदानावर सामूहिक बहिष्कार घालणार असल्याचे निवेदन आज तारीख १४ आकटोबर रोजी लाभार्थी यांनी नगर परिषद मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की सिंदखेडराजा नगरपरिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना शहरी या योजनेत सहभाग घेऊन अनुदान तत्त्वावर प्रत्येक लाभार्थी अडीच लाख रुपये अनुदान असे शासनाचे घरकुल नियमाप्रमाणे पूर्ण करून गेल्या दोन ते तीन वर्षापासून आम्ही शासन प्रशासनाकडे प्रलंबित रुपये ७५ ०००हजार अनुदान मागणीसाठी विविध निवेदने,



आंदोलने, मोर्चे, उपोषणे, विनंती अर्ज करूनही शासनाने आज पर्यंत आम्हाला आमच्या घरकुल अनुदानाच्या चौथ्या हप्त्याचे लाभ अद्याप आम्हाला मिळाला नाही. त्यामुळे आम्ही आर्थिक, सामाजिक व राजकीय नैराश्यग्रस्त असून शासनाला आमच्या मागण्याविषयी किंवा आमच्या म्हणून याला काहीच अर्थ नाही असे आम्हास वाटू लागली असल्यामुळे मग मतदान तरी कशाला करायच असं वाटू लागले आहे व या प्रलंबित अनुदानामुळे आमच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आहे आम्हाला पर राज्यात मोल मंजुरीसाठी जावे लागत आहे. वाढती महागाई आयुष्याची जमापूंजी, जमीन जुमला, पोट भरण्याची साधने, अंगावरील सोने नाणे डाग दागिने मोडून घरकुलाचे स्वप्न पूर्ण केले होते परंतु गेल्या कित्येक दिवसापासून मागणी करूनही प्रलंबित चौथ्या हप्त्याच अनुदान मिळालेच नसल्यामुळे व दिवाळी सण जवळ आल्यामुळे उसनवारी, व्याज व उसनवारी व्यवहारावर आणलेले पैसे व साहित्य आता लोक परत मागू लागले आहे त्यामुळे आधीच नैसर्गिक आपत्तीने ग्रासलेले असल्याने आम्ही आर्थिक अडचणीत सापडलो आहोत.

उपरोक्त विषयानुसार आम्हास तात्काळ आमच्या घरकुल अनुदानाचे प्रलंबित ७५०००/ रुपयाचे अनुदान तत्काळ वितरित करावे अन्यथा आम्ही येणाऱ्या विधानसभा निवडणूक मतदानावर सामूहिक बहिष्कार टाकू व होणाऱ्या न शासन जबाबदार राहील.

# विधानसभा निवडणुकीत आदर्श आचार संहिता भंग होणार नाही याची दक्षता घ्या

## प्रा.संजय खडसे निवडणूक निर्णय अधिकारी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

निवडणूकीचा बिगुल वाजला असून, आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे, निवडणूक घोषित होताच सिंदखेड राजा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री प्रा.संजय खडसे यांनी तात्काळ निवडणूक विभागाचे नोडल अधिकारी यांची सभा घेऊन सदर सभेमध्ये निवडणूक आचारसंहिता बाबत सुचना दिल्या व आचारसंहिता चे कुठेही उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्याचे सुचवले. तसेच मतदार संघातील केंद्र निहाय माहीती घेऊन तेथील सुविधेसाठी योग्य ती कार्यवाही गटविकास अधिकारी व नगर परिषदचे मुख्याधिकारी यांना दिल्या. सदर सभेस अजित दिवटे तहसीलदार सिंदखेडराजा, मुकेश माहोर गटविकास अधिकारी देऊळगाव राजा, प्रशांत व्हटकर मुख्याधिकारी नगर परिषद सिंदखेडराजा, प्रविण वराडे, आस्मा मुजावर नायब तहसीलदार सिंदखेडराजा, अंकुश म्हस्के कृषी अधिकारी सिंदखेडराजा, राजेश पवार, भास्कर घुगे विस्तार अधिकारी सिंदखेड राजा हे उपस्थित होते.

## पुणे शहरासाठी १ हजार नव्या ई-बसचा प्रस्ताव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

पुणे शहरात मेट्रोचं जाळं विस्तारत असताना पीएमपीएमएलचं सक्षमीकरण करण्यावर आपला भर असून पीएमपीएमएलसाठी मोदी सरकारच्या माध्यमातून १ हजार नव्या ई-बस मिळाव्यात, या संदर्भातील प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एचडी कुमारस्वामी यांना दिला. शिवाय या प्रस्तावासंदर्भात पुणे शहरातील बसेसची आताची संख्या, आवश्यकता आणि भविष्यातील गरज, यासंदर्भात चर्चा केली.

## चारोळी

निसर्गाच्या सहवासात
कधीतरी हरवूनी जावे
दु:ख वेदना विसरूनी
गीत ओठावरी यावे.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## तालुक्यात पीकविमा पॉलिसीचे वाटप



लोकनेता न्यूज नेटवर्क । सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

प्रधानमंत्री पिकविमा योजना खरीप हंगाम २०२४-२५ मधील 'मेरी पॉलिसी, मेरे हाथ' या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात पिकविमा पावती शेतकऱ्यांना वितरित करण्यात येत आहे. भारतीय कृषी विमा कंपनी यांच्याकडून खरीप पिक विमा २०२४-२५ मध्ये पिक विमा काढलेल्या शेतकऱ्यांना विमा पॉलिसी वितरीत करून मेरी पॉलिसी मेरे हाथ या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी ता. ९ ऑक्टोबर रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात कृषी विभागाचे पांचाळ, पिकविमा तालुका समन्वय योगेश मांटे व पॉलिसीधारक शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# कांदलगाव येथे ६५३ नागरिकांना मिळाला नेत्र तपासणी शिबिराचा लाभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील कांदलगाव येथे पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम आरोग्य सभापती प्रविण माने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरास कांदलगाव व परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सुरवात झाली.

सोनाई परिवाराचे संचालक अतुल माने यांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन पार पडले.कांदलगाव येथील श्री दत्त मंदिर येथे सकाळी १० ते ५ या वेळेत ६५३ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली असून यातील ४०२ नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर १० नागरिकांची पुणे भारती विद्यापीठ येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. कांदलगाव येथे पार पडलेल्या या शिबिराचे साधू सरडे,नरेश कुंभार,सुरज काशीद,राजू जाधव, निलेश रंधवे,छगन बनसुडे,अंकुश



दोरकर,डॉ.शरद शिर्के,डॉ.तमन्ना शेख,डॉ.संतोष रणवरे,डॉ शेख यांनी या कार्यक्रमाचे संयोजन व व्यवस्थापन पाहिले.या शिबिराच्या निमित्ताने गणेशजी मोहिते, सनी बंडगर, पांडुरंग राखुंडे,साधू ननवरे,आप्पासो राखुंडे, समाधान राखुंडे,बाळासाहेब हजारे,नवनाथ सरडे, वैभव गिरी,नवनाथ काशीद,साधू सरडे,राजू जाधव, बालाजी काशीद,नरेश कुंभार,विलास मोरे,अतुल जगताप,तुकाराम सुतार,समाधान मदने,निलेश राखुंडे,पप्पू ननवरे,सिद्धू कोळी,निलेश रंधवे,महावीर सातव ईत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# एक वेळ सुर्य उगवण्याची दिशा बदलेल पण मी उमेदवारी करणारच-सुवर्णा पाचपुते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

एक वेळ सूर्य पूर्व दिशे ऐवजी पश्चिमेकडून उगवेल पण आपण निवडणुकीतून माघार घेणार नसल्याचे भाजप नेत्या सौ.सुवर्णा ताई पाचपुते यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. भाजप मधून २० वर्षापूर्वी राजकीय कारकीर्द सुरू करून गेली २० वर्षे भाजप ला प्रतिकूल, अनुकूल परिस्थितीतही साथ देणाऱ्या सौ . सुवर्णा पाचपुते यांनी अडीच महिन्या पूर्वी श्रीगोंदा विधानसभा मतदार संघात फिक्स उमेदवार म्हणून फ्लेक्स लाऊन मतदार संघात दौरा केल्याने त्या प्रकाश झोतात आल्या गेल्या अडीच महिन्यात मतदार संघात फिरताना मिळालेला प्रतिसाद, मूलभूत प्रश्न मार्गी न लागल्याने लोकांचा सत्ताधाऱ्यां वरील रोष यातून आपण विजयी होऊ अशी आशा असल्याचे सांगून सौ. पाचपुते यांनी गेल्या १० वर्षात आपणावर पक्षाने जबाबदारी दिली ती पार पाडली पण पक्षाने २०१४,२०१९ मध्ये उमेदवारी दिली नाही बदल्यात जिल्हा परिषद निवडणुकीत उमेदवारी देण्याचा शब्द वरिष्ठांनी दिला तोही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक पाळला नाही असा आरोप करून २०१४ मध्ये भाजप ने कामाला लागा असा आदेश दिला पण पक्षात नव्या नेतृत्वाच्या प्रवेशाने उमेदवारी रद्द झाली पण आपण पक्ष वाढीसाठी काम केले विद्यमान आमदार बबनराव पाचपुते यांच्या साठी प्रचार केला काष्टी ग्रामपंचायत निवडणुकीत प्रताप पाचपुते यांचा प्रचार केला ,सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना निवडणुकीत आमदार बबनराव पाचपुते यांच्या पत्नी सौ . प्रतिभा पाचपुते प्रचार केला ,लोकसभा निवडणुकीत सुजय विखे यांचा प्रचार केला त्यामूळे पक्ष नक्की दखल घेईल लोकांची मागणी काय आहे याचा आदर पक्ष करेल असे सांगून सौ. पाचपुते यांनी पक्षाने आपणास उमेदवारी द्यावी कारण भाजप घराणे शाही चा पुरस्कार करणारा पक्ष नाही.



मतदार संघातील फ्लेक्स,दौरा,सुख दुःख,लग्न सोहळे,सामाजिक कार्यक्रमात सहभाग यासाठी रसद पुरवली जाते का? अशी चर्चा असल्याचे पत्रकारांनी विचारता सौ . पाचपुते म्हणाल्या माझ्याकडे कोणतीही सत्ता नाही,संस्था नाही माझा सर्व खर्च वडील शिवाजीराव नांद्रे हे आपल्या शेतातील उत्पादन विकून करत आहेत असे स्पष्ट करून आम्ही कोणाच्या प्रलोभनाला बळी पडणारे नसून आम्हाला पैशाने कोणी खरेदी करू शकत नाही आम्ही कोणाच्या आदेशाने उमेदवारी करत नसून कोणाच्या आदेशाने माघार देखील घेणार नाही

सामाजिक बांधिलकी म्हणून आपण दररोज लोकांच्या प्रश्नात असून मतदार संघात कुकडी,घोड आवर्तन, डिंभे - माणिकडोह बोगदा, साकळाई उपसा जलसिंचन प्रकल्प,उपजिल्हा रुग्णालय,कृषि महा विद्यालय हे पारंपरिक प्रश्न राजकीय अनास्थे मुळे सुटू शकले नाही ही या मतदार संघाची शोकांतिका असून हे चित्र बदलण्यासाठी माझी उमेदवारी असून मतदारांनी आज पर्यंत अनेकांना संधी दिली पण प्रश्न जैसे थे राहिल्याने मतदारांनीच मला दौऱ्या दरम्यान या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी उमेदवारी करण्याचा आग्रह धरला असून उमेदवारी करणारच याचा पुनरुच्चार करून मतदार संघात कोणत्याही आघाडी चे वातावरण नसून लोकच आता बदलाच्या प्रतीक्षेत आहेत आणि सर्वात कमी खर्चात आपण विजयी होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

> **“ भाजप उमेदवारी देईल का असे विचारता सौ . सौ.सुवर्णा ताई पाचपुते म्हणाल्या मी पक्ष बदलला नाही आणि २० वर्षात पक्षाचे ध्येय धोरणे राबवले,पक्ष वाढवला स्वर्गीय दिलीप गांधी, अभय आगरकर, मा.खा.सुजय विखे,आ.बबनराव पाचपुते, माजी मंत्री आ.राम शिंदे,स्व.सदाशिव पाचपुते,शिरूरचे बाबुराव पाचर्णे आदींचा प्रचार केला २०१४ आणि २०१९ मध्ये उमेदवारी साठी मुलाखत दिली पक्ष आपली निष्ठा आणि काम पाहून न्याय देईल - सौ. सुवर्णा पाचपुते,भाजप नेत्या,श्रीगोंदा**

## ब्रम्हलिन संत स्वामी निगमानंद महाराज यांची पाचवी पुण्यतिथी उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

शिरूर (कासार)तालुक्यातील श्री क्षेत्र मत्स्येंद्रनाथगड येथील वैकुंठवासी संत गुरूवर्य स्वामी निगमानंद महाराज यांची पाचवी पुण्यतिथी मौजे माळेवाडी ग्रामस्थांकडून दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. त्या प्रसंगी ब्रम्हनाथ संस्थानचे मठाधिपती महंत रामेश्वर महाराज शास्त्री यांची किर्तन सेवा संपन्न झाली. त्या प्रसंगी श्री क्षेत्र मत्स्येंद्रनाथगडाचे मठाधिपती महंत स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंद महाराज, ह.भ.प.उध्दव महाराज शास्त्री, ह.भ.प.सुरेशानंद महाराज, माजी आमदार भिमरावजी धोंडे, नरसिंगराव जाधव, सामाजिक कार्यकर्ते गोकुळ सानप रायमोहाकर उपस्थितीत होते. तसेच मौजे माळेवाडी ग्रामस्थांकडून सर्व संत महंत टाळकरी,



मृंदगाचार्य, गायक,
विणेकरी, यांचे आदरतिथ्य करण्यात आले. ब्रम्हलिन संत स्वामी निगमानंद महाराज यांचा पाचवा पुण्यतिथी उत्सव यशस्वी करण्यासाठी शंकरराव लांडगे, उत्तमराव मामा व्हरकटे, नन्नवरे सर, विठ्ठल खताळ सर, माणिक कातखडे सर, संजय खताळ, राजाभाऊ खताळ, अशोक खताळ सर, रामनाथ खताळ सर, नवनाथ खताळ, राजेंद्र कातखडे, बाळु व्हरकटे, सुखदेवराव लांडगे, अशोकराव व्हरकटे यांनी विशेष परिश्रम घेतले. तर महाप्रसाद पंगत अंकुशराव कातखडे व ग्रामस्थ यांच्या वतीने देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिर्के सर यांनी केले, तर आभार नन्नावरे सर यांनी मानले. पुण्यतिथी कार्यक्रमास मौजे माळेवाडी, मौजे नांदेवली, निंमगाव मायंबा येथील ग्रामस्थ महिला भगिनी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## संदिप पाटील कवळे यांच्या हस्ते किनवट येथे अभिजित इंडस्ट्रीज चे उद्घाटन





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

अभिजीत इंडस्ट्रीज बॅग निर्माते व बारदानचे होलसेल विक्रेते भव्य शुभारंभ सोहळा नायगाव मतदारसंघाचे युवा नेते संदीप पाटील कवळे यांच्या हस्ते पार पडला. दि.१५ ऑक्टोंबर २०२४ रोज मंगळवारी किनवट जिल्हा नांदेड येथे अभिजीत इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी किनवट चे मालक श्री यशवंत जाधव यांनी नवीन व्यवसाय सुरू केला असता यावेळी युवा नेते संदीप पाटील कवळे यांच्या हस्ते या कंपनीचं उद्घाटन करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून किनवटचे आमदार श्री भीमरावजी केराम साहेब, माजी सभापती बापूराव पाटील करकाळेकर, श्री लिंगराम पाटील कवळे, व अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## दिपभारती विद्यालयात भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित दिपभारती विद्यालय दानापूर येथे भारतरत्न डॉ . ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली .यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री वाय एस गवळी यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी शाळेचे शिक्षक श्री एस एस कळात्रे यांनी त्यांच्या योगदानाविषयी सखोल माहिती दिली तसेच शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री वाय एच कापरे यांनी डॉ कलाम यांच्या जयंती प्रित्यर्थ साजऱ्या होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाविषयी माहिती दिली व त्याचे महत्व विषद केले यावेळी शाळेचे सर्व विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

## विनापरवाना देशी-विदेशी दारुची विक्री करणाऱ्या आरोपीकडुन ७,७५,४६०/- रुपयांचा मुददेमाल जप्त : श्रीगोंदा पोलीसांची धडक कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

अहिल्यानगरचे पोलीस अधिक्षक राकेश ओला ,अपर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे , व मा.उप विभागीय पोलीस अधिकारी, विवेकानंद वाखारे विभाग व पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली मा. पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांना गुप् बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, खांडगांव शिवारात श्रीगोंदा ते मांडवगण जाणारे रोडवर एक सुझुकी कंपनीची कॅरी गाडीत एक अनोळखी इसम हा देशी-विदेशी दारुच्या बॉक्सची विनापरवाना बेकायदा चोरुन विक्री करत आहे, अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पो.नि किरण शिंदे , यांनी लागलीच गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे, पोना/गोकुळ इंगावले, पोकों/संदिप राऊत, पोकों/संदिप शिरसाठ व पोकों/आनंद मैड यांना सदरची बातमी सांगून कायदेशीर कारवाई करणेबाबत सांगितल्याने लागलीच पोना/गोकुळ इंगावले यांनी दोन खाजगी पंचाना पोलीस स्टेशन येथे बोलावून सदरची माहिती सांगून कारवाई करणेकामी सोबत येण्यास कळविल्याने खांडगांव शिवारात श्रीगोंदा ते मांडवगण जाणारे रोडवर हॉटेल



यशोदा समोरील रोडवर सापळा रचुन विनापरवाना बेकायदा देशी-विदेशी दारुची विक्री करणारा इसम नामे शैलेंद्र सुखदेव बोरगे वय-५२ वर्षे रा. सोनेवाडी ता.जि. अहिल्यानगर यास सुझुकी कंपनीची कॅरी गाडीसह ताब्यात घेवून त्याचेकडून ५,००,०००/- रुपये किमंतीची सुझुकी कंपनीची कॅरी व २,७५,४६०/- रुपये किमंतीची देशी-विदेशी दारु असा एकुण ७,७५,४६०/-रुपये किमंतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत पोकों/३१४ संदिप शिरसाठ यांनी सरकार तर्फे फिर्यादी होवून श्रीगोंदा पो.स्टे गु.रजि.नं-०९१०/२०२४ मु. दारुबंदी का.क.६५ (अ) (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना/२९५ गोकुळ इंगावले हे करीत आहे.

## साहेबराव नंदन लिखित परिसस्पर्श कादंबरीचे थाटात प्रकाशन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पिंपळनेर । अॅड.सूचित गवळी**

येथील सेवानिवृत्त प्राध्यापिका सौ.पुष्पलता संभाजी पगारे यांच्या संपूर्ण जीवनावर आधारित लेखक गावगाडाकार तात्यासो. श्री साहेबराव नंदन लिखित अस्सल ग्रामीण बाज व परंपरा, रूढी व संघर्षातून जीवनाचे सोनं करणारी परिसस्पर्श,या चरित्रात्मक(कांदबरी) पुस्तकाचे प्रकाशन मोठ्या जल्लोषात थाटात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य श्री विलासराव चव्हाण हे ह्या सोहळ्यात अध्यक्षस्थानी होते.प्रकाशन सोहळा दाजी साठ्ये इंग्लिश मेडियम स्कूल च्या सभागृहात नुकताच मोठ्या उत्साहात घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पालखेड नाशिकचे ग्रामीण साहित्यिक, कवी, संपादक श्री विजयकुमार मिठे,अॅड. श्री संभाजीराव पगारे, सभापती श्री हर्षवर्धन दहिते, कविवर्य श्री जगदीश देवपूरकर,ज्ञानसिंधू प्रकाशनचे श्री तान्हाजी खोडे, अमळनेरचे साहित्यिक श्री प्रकाश पाटील,कीर्तनकार सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री रामचंद्र महाराज नंदन,पत्रकार श्री राजेंद्र गवळी, अ.भा.मा. महा संघाचे श्री विलासराव पाटील, श्री वसंतराव बच्छाव, श्री प्रदीप कोठावदे, श्री विष्णू जिरे पाटील, श्री विजयराव सोनवणे, श्रीदेवेंद्र गांगुर्डे, श्री योगेश नेरकर, श्री विनोद कोठावदे, श्री सतीश पाटील, श्री पांडुरंग सूर्यवंशी, श्री प्रमोद गांगुर्डे, श्री स्वप्नील पगारे, सौ.छायाताई पगारे,सुवर्णा आजगे, ईश्वर बोरसे, श्री केदा आण्णा जाधव प्रा. डी. टी. पाटील, सौ.संगीता अभय भामरे दहिवेल,माजी उपप्राचार्य डी. झेड. पाटील, प्रा.एस.डी.पाटील, श्री कमलाकर क्षीरसागर,हभप विजय काळे, ललित साळवे, अशोक पाटील नाशिक, सौ. तारका विवरेकर, डी.एल. पाटील,डॉ. राजेंद्र पगारे, वसंत चौधरी, प्रशांत कोतकर, भीमराव सोनवणे, यांच्या सह अनेक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी साहित्यिक विजयकुमार मिठे यांनी लेखक श्री साहेबराव तात्या नंदन यांच्या कांदबरी लिखाणाचे



कौतुक करीत या पुस्तकातून नायिका पगारे यांच्या जीवनावर संस्कार, चांगल्या रूढी परंपरा यांचे संमिश्र दर्शन घडवले आहे. स्री नायिका पुष्पलता पगारे यांच्या जीवनातील संघर्ष, परिश्रम, जिज्ञासा, दातृत्व,अशा गुणांच्या माध्यमातून संस्कार देणारे पुस्तक असल्याचे ही कौतुक केले. तर प्राचार्य विलासराव चव्हाण यांनी, पुष्पलता पगारे यांच्या पतीसहवासाचा परिसस्पर्श यांच्यातील तुलनात्मक मुद्दा मांडत कांदबरीतील नायिका यांचे जीवनातील संघर्ष, कुटुंब प्रेम,समर्पण भावना, परोपकारी वृत्ती अशा प्रसंगानुरूप घटनांचे वर्णन करून लेखकाचे ही कौतुक केले. कार्यक्रमात जगदीश देवपूरकर यांनी त्यांच्या बहारदार शैलीत मनोगत व्यक्त केले. तर प्रकाशक तान्हाजी खोडे,कवी प्रकाश पाटील, हभप रामचंद्र महाराज नंदन, प्रा.एस.डी. नंदन सौ संगीता भामरे,लेखक श्री साहेबराव नंदन,प्रा.पुष्पलता पगारे आदी मान्यवरांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राजेंद्र गवळी यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उमेश माळीसर व प्रा. सौ.सविता पगारे यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन टाळ्यांच्या गजरात करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मनीष माळी, राजेंद्र क्षीरसागर, शांताराम मोरे, उमेश माळी, मुख्याध्यापक श्री जगताप,राजेंद्र सोनवणे,श्री वाणी,मुख्याध्यापक श्री गवळी,गोरख पवार, पिंपळनेर, सामोडे,कुसुंबा आश्रमशाळेतील शिक्षक, संचालक मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सर्वांनी सुरूची भोजनाचा लाभ घेत निरोप घेतला.

# येणाऱ्या विधानसभेत तुम्ही बदल घडवा मी कंधार-लोहा घडवतो-प्रा.मनोहर धोंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**





लोहा-कंधार विधानसभा मतदार संघातील जनता जागृत असून या मतदारसंघाचा नावलौकिक संपूर्ण महाराष्ट्रात आहे,येथील शेतकरी,शेतमजूर,कष्टकरी महिला आबाल वृद्धांनी नेहमी सत्याची पाठराखण केली आहे,हा मतदार संघ ऐतिहासीक क्रांतिकारी विचारांचा असून येथील बहाद्दर जनता नाते-गोते व घराणेशाहीला कंटाळली असून आगामी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मतदार संघातील जनता घराणेशाहीला धडा शिकवून माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यास लोहा-कंधार मतदार संघातीतून आमदार करतीलच आशा अशावाद सेवा जनशक्ती पार्टीचे प्रा,मनोहर धोंडे यांनी बोलतांना म्हणाले,

यावेळी डॉ.रामराव सदावर्ते,स्वप्निल बासटवार,मयूर नळदकर,ड शेख मगदूम,प्रवीण पद्मवार,मधुकर मुसळे,गोविंद हबगुंडे,शेख हबीब भाई,साईनाथ मळगे,वसंत पापीनवार,प्रवीण महाजन, मोहन मुत्तेपवार,उत्तम भागानगरे, मुंडेवाडीचे तंटामुक्ती अध्यक्ष अर्जुन मुंडे,भागवत मुंडे,माणिक मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती,

यावेळी पुढे बोलताना प्रा.धोंडे म्हणाले मी गेल्या ४० वर्षापासून मतदार संघातील प्रत्येक गाव,वाडी,तांड्यावर पायपीट केली असून मतदार संघातील गोरगरीब शेतकरी,कष्टकरी, अपंग, निराधार, सालदार,शेतमजूर सुशिक्षित बेरोजगार यांना न्याय मिळावा त्यांचे प्रश्न सुटावेत या करिता मतदार संघामध्ये सातत्याने गाठी भेटीवर भर देत विचारांची देवाण-घेवाण मोठी चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे,१५ जुन पासून ३ ते ४ महिन्यांपासून लोकसभेचा निकाल लागल्यापासून कंधार व लोहा वाडी तांड्यात जाऊन आमचे मत मांडले व लोकांच्या व्यथा समजून घेत आहोत, कंधार लो ह्यात मतदारसंघांमध्ये २ लाख ९९ हजार मतदार आहेत,त्याच पद्धतीने २ नगरपालिका जवळपास ३०० गावांचा मतदारसंघ आहे,जवळपास ८१ तांडे तसेच वाड्या ६१ आहेत त्यापैकी १४२ वाड्यातांडे मतदार संघात आहेत,पुढे बोलताना म्हणाले तीनशे गावांमध्ये पोहोचलो असे ते बोलत होते,कंधारच्या नंतर नगरपालिका जिल्हा पातळीपर्यंत पोहोचल्या दुर्दैवाने कंधारचा विकास झाला नाही, ज्यांना मतदार बंधूंनो तुम्ही ज्यांना आमदार म्हणून निवडून दिलं ? खासदार म्हणून निवडून दिलं ? नगरपालिकेत निवडून दिलं ? त्यांच्याकडून माफक अपेक्षा आहेत, पण दुर्दैवाने उणी-दुणी काढण्यात व घमंड शाहीमध्ये हातावर पोट घेऊन जगणाऱ्या व्यापाऱ्यांच्या पोटावर पाय देऊन राजकारण केलंय असे प्रा.मनोहर धोंडे जाहिर सभेत कंधार येथील महाराणा प्रताप चौकात बोलत होते,

भारत देशास स्वातंत्र्य मिळून ७६ वर्ष पूर्ण झाली असून मतदारसंघातील अनेक वाडी तांडे मुलभूत विकासापासून शिक्षण,दळणवळण पासून ना कोसोदूर आहेत, हा मतदारसंघ रस्ते,वीज,सिंचन,या सुविधेपासून नेहमीच वंचित नेहमीच दुर्लक्षित उपेक्षित राहिलेले आहे.या मतदारसंघमध्ये खोटे बोलण्याची स्पर्धा लागली असून विकास कामे फक्त कागदावरच झालेली दिसून येत आहेत,येथे येणारा विकास निधी हा विकासासाठी न वापरता घरे भरण्यासाठी वापरत असल्याचा आरोप प्रा.धोंडे यांनी केला.सर्वसामान्य नागरिक जनता हेच माझे दैवत आहेत,सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता आमदार झाला तरच मतदार संघाचा खऱ्या अर्थाने विकास होईल,मी आगामी २०२४ ची विधानसभेची निवडणूक सर्व ताकतीनिशी लढवणार असून सर्व सामान्य जनतेच्या आशीर्वादाने आमदार होणारच असा निर्धार त्यांनी बोलताना व्यक्त केला.

# डॉ.गोपाल बछिरे यांचा वाढदिवस समाज उपयोगी विविध उपक्रमाने साजरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार डॉ. गोपाल बछिरे यांचा वाढदिवस समाज उपयोगी विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला महाविकास आघाडीच्या माध्यमाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोपाल बछीरे यांच्या वाढदिवसानिमित्त, गोशाळेमध्ये गाईंना चारा वैरण देण्यात आले, वैदु गोंड पारधी महिला भगिनी यांना साड्यांचे वाटप करून एक सामाजिक बांधिलकी जपण्यात आली, गरजवंतांना ब्लँकेट चे वाटप करण्यात आले तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले हे उपक्रम दिवसभर चालले व सायंकाळी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष यांचे नेते कार्यकर्ते व डॉ. बछिरे यांच्यावर प्रेम करणारे आप्त इष्ट लोकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला याप्रसंगी राष्ट्रीय काँग्रेसचे शैलेश सावजी, कलीम खान, नंदकुमार गोरे, देवानंद पवार, भूषणभाऊ मापारी, ज्ञानेश्वर चिभडे मामा, केशवराव फुके, शांतीलाल गोगलिया, अमोल सोनवणे, तोफिक कुरेशी, विकास मोरे, राष्ट्रवादीचे सदानंद पाटील तेजनकर, इब्राहिम शेख, दत्ता पाटील घनमट, विजय मोरे, वाजेद खान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नंदू कराडे, नारायण बळी, किसन पाटील, लिंबाजी पांडव, किशोरभाऊ गारोळे, संदीप गारोळे, ॲड दीपक मापारी, गजानन जाधव, परमेश्वर दहातोंडे, लुकमान कुरेशी, इक्बाल कुरेशी, सय्यद उमर, श्रीकांत मादनकर, गणेश सवडतकर, यांच्यासह मोठ्या संख्येने शुभेच्छा देणारे व डॉ. बछिरे यांच्यावर प्रेम करणारे शुभेच्छा देणारे उपस्थित होते.

# वाघोलीत कचऱ्यांचे ढीग नागरिकांचे आरोग्य धोक्यात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

महानगरपालिकेत वघोलीचा समावेश होऊन बराच काळ लोटला असुन अजुनही घाणीचे साम्राज्य दिवसेंदिवस वाढत आहे. अपुऱ्या कचराकुंड्या , अपुरा सफाई कर्मचारी वर्ग, अवास्तव पैश्यांची मागणी ईत्यादि कारणांमुळे वघोलीतील घान कचरा व्यवस्थापन समस्या मात्र ऐरणीवर आली आहे.


ठिकठिकाणी कचराकुंड्या नसल्याकारणाने रस्त्याच्या कडेला किंवा पादचारी मार्गावर कचऱ्याचे ढीग पडुन त्या कचऱ्याची दुर्गंधी पसरत आहे. शाळकरी मुलांना व वाघोलीकरांना जाताना येताना त्याचा नाहक त्रास होत आहे व दुर्गंधी पसरून आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

महानगरपालिकेने घाण कचऱ्याचा प्रश्न तात्काळ सोडवावा जेणेकरून जनतेला त्याचा त्रास होणार नाही. व घाणीचे साम्राज्य दिवसेंदिवस वाढणार नाही. लोकनेता प्रतिनिधीशी बोलताना महानगरपालिका आयुक्त श्री संजय पोळ यांनी तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# गोपीनाथ मुंडे अपघाती विम्याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा-विकास नारनाळीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**




स्व. गोपीनाथ मुंडे अपघाती विमा योजनेचा लाभ तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर यांनी केले आहे.

स्व गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना - शेती व्यवसाय करत असताना - होणारे अपघात विशेषतः वीज - पडणे, सर्पदंश, पाण्यात बुडून मृत्यू होणे, विजेचा शॉक लागणे, पुरामध्ये वाहून जाणे या नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्ते अपघात यामुळे शेतकऱ्याचा मृत्यू किंवा अपंगत्व येते. त्यामुळे अपघातग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी वहितीखालील खातेदार शेतकरी व वहिती खालील खातेदार म्हणून नोंद नसलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील एक सदस्य (आई, वडिल, पती, पत्नी, मुलगा, अविवाहित मुलगी, सून यापैकी १ सदस्य) असे १० ते ७५ वयोगटातील एकूण २ सदस्यांना या योजनेमार्फत आर्थिक लाभ दिला जातो. अपघात अपघातग्रस्त शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास अथवा २ अवयव निकामी झाल्यास रुपये २ लाख व अपघातामध्ये शेतकऱ्याचा एक अवयव निकामी झाल्यास रुपये १ लाख रुपये विमा दिला जातो.

या योजनेमध्ये मुखेड तालुक्यातील सन २०२४.२४ मधील ८ प्रस्ताव व सप्टेंबर २४ अखेर १० प्रस्ताव असे एकूण १८ प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी कार्यालयास प्राप्त झाले होते. त्यापैकी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली झालेलया तालुका बैठकीत ८ प्रस्ताव मंजूर करण्यात आले तर दोन प्रस्ताव नामंजूर झाले आहेत. उर्वरित आठ प्रस्तावांमध्ये त्रुटी आहे. मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा रस्ते अपघातात मृत्यू झाल्यास अथवा अपंगत्व आल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर यांनी केले आहे.

## परमेश्वर इंगोले यांच्या प्रयत्नाला यश

# अनेक गावांचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समावेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगांव तालुक्यातील जवळा बुद्रुक येथील रहिवासी असलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले यांच्या प्रयत्नाला यश आले असून या यशाबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. परमेश्वर इंगोले यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये वंचित राहिलेल्या काही गावांचा समावेश करण्याची मागणी निवेदनाद्वारे प्रकल्प संचालक नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई यांच्याकडे केली होती. या त्यांच्या मागणीला यश आले असून आजेगांव सर्कलमधील आजेगाव,शिंदेफळ, चांगेफळ ,शिवनी खुर्द,शिवनी बुद्रुक,बेलखेडा तसेच देवकरवाडी,,जवळा बुद्रुक या गावांचा समावेश नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये झाला असून त्याबाबतचे पत्र परमेश्वर इंगोले यांना प्राप्त झाले आहे. तर शेतकऱ्यांसाठी केलेल्या या उत्कृष्ट कामगिरी बद्दल परमेश्वर इंगोले यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शेतकरी,गोरगरीब व सर्वसामान्यांच्या अडी अडचणीसाठी परमेश्वर इंगोले हे नेहमी तत्पर असतात त्या अनुषंगाने त्यांनी सेनगांव तालुक्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये वंचित राहिलेल्या गावांचा तात्काळ समावेश करण्याची मागणी शासनाकडे केली होती त्या अनुषंगाने त्यांच्या निवेदनाची दखल घेतली असून परमेश्वर इंगोले यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

# आ.राजेश पवार यांच्या निषेधार्थ नरसी येथे रास्ता रोको व बाजारपेठ बंद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगांव । प्रतिनिधी**



नायगाव मतदार संघाचे आ. राजेश पवार यांनी बौद्ध आणि मातंग समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करून दोन समाजात फूट पाडण्याचे बेताल वक्तव्य केले या कारणावरून तालुक्यातील नरसी येथील बाजारपेठ बंद ठेवून रास्ता रोको करण्यात आला.याबाबत सविस्तर वृत्त असे की मौजे नरसी येथे दि. ११ ऑक्टोंबर रोजी नायगाव मतदारसंघाचे आमदार राजेश पवार यांनी विकास कामाच्या उद्घाटनाच्या प्रसंगी नरसी चौकात सत्यशोधक डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या ऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवला पाहिजे असे वक्तव्य केले होते.

या वक्तव्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होऊ शकते या कारणावरून युवा नेतृत्व साईनाथ कांबळे जिगळेकर व सामाजिक कार्यकर्ते देविदास सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात नरसी येथे भाजपाचे आमदार राजेश पवार यांचा निषेध म्हणून दि.१५ ऑक्टोंबर रोजी येथील बाजारपेठ कडकडीत बंद ठेवून तब्बल दोन तास रास्ता रोको करण्यात आला होता. यामुळे बराच वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. नरसी येथील पोलीस चौकीच्या बाजूला निषेध सभा ठेवण्यात आली होती यावेळी रिपब्लिकन सेनेचे राज्यसचिव माधव जमदाडे,जिल्हा अध्यक्ष अनिल शिरसे, सामाजिक कार्यकर्ते राहुल जिगळेकर, खाकीबा सूर्यवंशी, माधव वाघमारे,प्रीतम गवाले, माजी नगराध्यक्ष गणपत गायकवाड,श्याम गायकवाड, दिनेश सूर्यवंशी, गंगाधर कोत्तेवार, आदींनी निषेध सभेला संबोधित केले व निषेध सभेचे सूत्रसंचालन लालबा सुर्यवंशी यांनी केले.यानंतर रस्त्यावर उतरून आमदार राजेश पवार यांच्या प्रतिमेला चप्पलने मारत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी जळबा सूर्यवंशी,रमाकांत सूर्यवंशी,अशोक सूर्यवंशी,बबलू नरसीकर, संदीप उमरे, सचिन भेदे,मौला चांद पटेल,शुभम भेदे,गजानन सूर्यवंशी,प्रकाश सूर्यवंशी,सुभाष सूर्यवंशी,अमोल सूर्यवंशी आदीने परिश्रम घेतले.

# अंकिता पाटील यांच्या जनसंवाद यात्रेस जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## महिलांची उपस्थिती लक्षणीय;जनसंवाद यात्रेचा तिसरा दिवस





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पक्षाच्या युवा नेत्या व पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अंकिता पाटील-ठाकरे यांच्या रविवार पासून इंदापूर तालुक्यामध्ये चालू असलेल्या जनसंवाद यात्रेस जनतेचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. या जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून अंकिता पाटील- ठाकरे ह्या इंदापूर तालुक्याचा गेल्या १० वर्षात झालेल्या नियोजन शून्य विकासाचा व मलिदा गँगच्या भ्रष्टाचाराचे वास्तव चित्र जनते समोर मांडत आहेत.या जनसंवाद यात्रेचा मंगळवार (दि.१५) हा ३ रा दिवस होता. व्याहळी येथील भैरवनाथ मंदिरामध्ये नारळ फोडून अंकिता पाटील ठाकरे यांनी या जनसंवाद यात्रेचा रविवारी (दि.१३) सकाळी शुभारंभ केला. इंदापूर तालुक्यात गेल्या १० वर्षांमध्ये विद्यमान लोकप्रतिनिधिकडून शिक्षण क्षेत्रात,रोजगार उपलब्ध करुन देणे आदी अनेक क्षेत्रामध्ये विकासाचे कोणतेही काम झालेले नाही.तालुक्यात फक्त मलिदा गँगच्या ठराविक लोकांचाच विकास झाला आहे.त्यामुळे विकासाची निकृष्ट कामे करणारी मलिदा गँग हटाव तालुका बचावचे आवाहन अंकिता पाटील-ठाकरे या जनसंवाद दौऱ्यात करीत आहेत.राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार,खा.सुप्रिया सुळे यांनी इंदापूर विधानसभा मतदारसंघातून माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने विधिमंडळात पाठविण्याचे आवाहन केले आहे,त्यास जनतेने साथ द्यावी व इंदापूर तालुक्याच्या विकासाची जबाबदारी सोपवावी, असे आवाहनही अंकिता पाटील ठाकरे करीत आहेत.या जनसंवाद यात्रेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे पुणे जिल्हाध्यक्ष सागरबाबा मिसाळ,इंदापूर तालुका महिला अध्यक्षा छायाताई पडसळकर आदिसह पक्षाचे अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

# संचालिका पुजाताई पाटील कवळे -जाधव यांच्या उपस्थितीत शाळेची आढावा बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



दिनांक १५/१०/२०२४ रोजी मा.पूजाताई कवळे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व्यंकटराव पाटील कवळे विद्यालय कुसुमनगर वाघलवाडा व श्री छत्रपती शिवाजी इंग्लिश स्कूल उमरी या दोन्ही शाळेची आढावा बैठक घेण्यात आली.व दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी मा. पूजाताई पाटील कवळे पाटील (vpk उद्योग समूह ) अध्यक्ष स्थानी उपस्थित होते.आणि प्रमुख पाहुणे म्हणून श्री आंबटवार साहेब ( सर व्यवस्थापक vpk उद्योग समूह )श्री यू जी कदम सर ( जनसंपर्क अधिकारी ),श्री पवार साहेब ( शेतकी अधिकारी )' पडोळे साहेब ( ऊस विकास अधिकारी ) टेकुलवार सर ( सहशिक्षक ) हे सर्वजण उपस्थित होते. व दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या. व या कार्यक्रमांमध्ये मा.पूजाताई यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. आणि या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हंबर्डे मॅडम यांनी केले.व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ भोसले मॅडम यांनी केले.

# आ.डॉ.तुषारजी राठोड यांच्या प्रयत्नामुळे पेठवडज साठी १४९९.९२ लक्ष निधी उपलब्ध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

आ.डॉ. तुषार गोविंदराव राठोड यांनी मा. सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण कार्यालय, नांदेड यांच्या कडे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत मौ. पेठवडज ता. कंधार जि. नांदेड येथे अनु. जाती व नवबौध्द घटकांच्या विकासाकरीता महाराष्ट्र शासनाकडे शिफारस केली होती.
त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून शासन निर्णय क्र. दवसु-२०२५/प्र.क्रं ३४७/अजाक, मंत्रालय मुंबई -३२ दि.०९/ ०३/२०१८ नुसार उपरोक्त संदर्भिय विषयानुषंगाने, मतदारसंघातील मौ. पेठवडज ता. कंधार जि. नांदेड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योतनेतंर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह बांधकाम / वाचनालय/अभ्यासिका व ज्येष्ठ नागरिकांसाठी धम्मकेंद्र, विपशना केंद्र यांचे बांधकाम करण्यासाठी डॉ तुषार राठोड यांनी विहीत नमुन्यात प्रस्ताव आपल्या कार्यालयाकडे सादर केला तो प्रस्ताव आपल्या कार्यालयाकडून मा. आयुक्त, समाजकल्याण पुणे यांच्याकडे पाठविण्याबाबत राठोड यांनी दिलेल्या निवेदनावरुन समजते.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत मौ. पेठवडज ता. कंधार जि. नांदेड येथे अनु. जाती व नवबौध्द घटकांच्या विकासाकरीता महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून सहकार्य केले त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.त्याबद्दल पेठवडज येथील जनतेने डॉ तुषार राठोड यांचे आभार मानले आहेत.



# पर्यावरण हा जगण्याचा भाग राज्य अध्यक्ष प्रमोददादा मोरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



बैठकीत पर्यावरण विषयक स्पर्धा आणि कार्यालय सुरू करण्याचा ठराव संमत,
वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन पर्यावरणाच्या समतोलासाठी आवश्यक असून पर्यावरण हा सर्वांच्या जीवनाचा आणि जगण्याचा भाग आहे,असे प्रतिपादन निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी व्यक्त केले.अहिल्यानगर सावेडी येथील सिद्धिविनायक मंदिरात नुकतीच निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळाची सभा कार्याध्यक्ष छायाताई राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर,अध्यक्ष प्रमोद मोरे,सचिव वनश्री मोरे-गुणवरे, सचिव डॉ.अनिल लोखंडे,सरपंच बाळासाहेब ढोले यांच्या प्रमुख उपस्थित आयोजित करण्यात आली होती.यावेळी सर्वप्रथम सिद्धिविनायकास पुष्प वाहून वंदन करण्यात आले.निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदुषण मंडळांच्या बैठकीचे प्रास्ताविक व स्वागत राज्य संघटक डॉ.शरद दुधाट यांनी केले.याप्रसंगी मंडळातील पदाधिकारी यांची वेगवेगळ्या निवडीबद्दल व विशेष प्राविण्याबद्दल डॉ.अनिल लोखंडे,डॉ.शरद दुधाट,संतोष परदेशी,चंद्रकांत भोजने, वर्षाताई घुले,मनोहर खवळे, उत्तम पवार,जेष्ठ कवी महादेव लांडगे,पत्रकार अण्णासाहेब साबळे,यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी आंबीखालसाचे सरपंच बाळासाहेब ढोले,कार्याध्यक्ष संतोष परदेशी,जिल्हाध्यक्ष लतिका पवार,सचिव डॉ.अनिल लोखंडे,जिल्हाध्यक्ष तुकाराम आडसूळ,अर्जुन राऊत,महादेव लांडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी सजीवांच्या अस्तित्वासाठी प्राणवायू खूप मोलाचा असून पर्यावरण आणि वृक्षांचे संवर्धन ही काळाची गरज आहे.तसेच प्रमोद मोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मंडळाच्या यशस्वी वाटचालीबद्दल त्यांनी कौतुक केले.प्रमोद मोरे यांनी सभेतील विविध विषयांचे सविस्तर विवेचन केले तर अध्यक्षा छायाताई राजपूत यांनी मंडळाच्या तालुक्यानुसार शाखा सुरू कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.या प्रसंगी डॉ.प्रवीण गुणवरे,बाळासाहेब गाडेकर, अशोक भोसले,प्रकाश केदारी, राजेश परदेशी,मोहन खवळे, आशा कांबळे,मदन राजपूत, पद्मा राजपूत,राजेंद्र आहेर, राजश्री आहेर,चंद्रकांत भोजने, बाळासाहेब बोडखे,जेष्ठ कवी महादेव लांडगे,राज्य प्रसिद्ध प्रमुख अण्णासाहेब साबळे, यांच्यासह पर्यावरण मंडळातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीच्या आयोजनासाठी जिल्हाध्यक्ष लतिका पवार व अवधूत पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार कार्याध्यक्ष संतोष परदेशी यांनी मानले.

# लोणी येथील असंख्य युवक कार्यकर्त्यांनी राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटात जाहीर प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



परळी तालुक्यातील लोणी येथील शेकडो असंख्य युवक कार्यकर्त्यांचा युवक नेते राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत जाहिर प्रवेश करण्यात आला. राजेभाऊ फड यांनी प्रवेश केलेल्या सर्वांच्या गळ्यात पक्षाचा रुमाल टाकून सर्वांचे स्वागत करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेलचे अध्यक्ष गणेश देवकते यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. लोणी येथील युवा कार्यकर्ते भागवत काचगुंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेल परळी वैजनाथ तालुका सचिवपदी राजेभाऊ फड यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.

परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांच्या विधानसभा संपर्क कार्यालयात परळी तालुक्यातील लोणी येथील असंख्य युवक कार्यकर्ते यांनी युवा नेते राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट पार्टीत जाहीर प्रवेश केला. युवा नेते राजेभाऊ फड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रभाकर काचगुंडे, रघुनाथ काचगुंडे, धम्म केदारे, प्रल्हाद सोनवणे, बंटी सोनवणे, कृष्ण देवकते, अमोल देवकते, तुकाराम काचगुंडे, गणेशराव देवकते, भागवत काचगुंडे, भगवान मंजुळ, सुदाम केदारे, पिकलं देवकते, संदिपान देवकते, अभिजित काचगुंडे, दत्ता काचगुंडे, अरुण काचगुंडे, अंगद सातपुते यांच्यासह असंख्य युवकांचा प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश झाला. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार साहेब उत्तुंग व्यक्तिमत्व आहेत.त्यांच्या विचारांनी व कार्याने प्रभावित होऊन अनेक युवक पक्षामध्ये प्रवेश करीत आहेत. त्या सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो. अनेक पदाधिकारी व तरुण सहकाऱ्यांच्या पक्ष प्रवेशाने परळी विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटना नक्कीच बळकट होईल व राष्ट्रवादीची ताकद देखील वाढणार आहे. त्यादृष्टीने सर्वांनीच पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम एकजूटीने करावयाचे आहे,असे आवाहन युवा नेते राजेभाऊ फड यांनी केले. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आ.जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष आ. संदिप क्षीरसागर यांच्या सूचनेनुसार परळी वैजनाथ राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेलच्या परळी वैजनाथ तालुका सचिवपदी लोणी येथील युवा नेतृत्व भागवत कचगुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राजेभाऊ फड यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासांत आपण भरीव कार्य कराल व पक्ष संघटना अधिक मजबुतीने उभी कराल ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष जिवनराव देशमुख, भटक्या विमुक्त सेल अध्यक्ष गणेश देवकते, मुक्ताराम गवळी आदी उपस्थितीत होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904